दिनांक 21.1.2023

**पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई**
**पोलीस शिपाई भरती सन 2021**
**सुचना क्रमांक -04**

---

पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई या घटकाच्या आस्थापनेवर पोलीस शिपाई भरती-2021 आयोजित करण्यात आलेली आहे. सदर पोलीस शिपाई भरती करीता ऑनलाईन आवेदन अर्ज प्राप्त झालेले आहेत. आवेदन अर्ज प्राप्त झालेल्या उमेदवारांची कागदपत्र पडताळणी दि.17/01/2023 रोजी पासून लोहमार्ग पोलीस मुख्यालय घाटकोपर, पंतनगर मुंबई येथे टप्याटप्याने घेण्यात येत आहे.

तरी ज्या उमेदवारांना दिनांक 23.01.2023 पासून कागदपत्र पडताळणी, शारिरीक मोजमाप चाचणी व मैदानी चाचणी करीता हजर राहण्याबाबतचे प्रवेश पत्र प्राप्त होईल त्या उमेदवारांनी सोबत जोडलेले हमीपत्र घेवून कागदपत्र पडताळणीवेळी उपस्थित रहावे.

पोलीस आयुक्तालय, लोहमार्ग मुंबई

**पोलीस शिपाई भरती सन 2021**

# हमीपत्र - 01

मी ........................................................... लिहुन देतो/देते की,

मी लोहमार्ग पोलीस शिपाई भरती-2021 मध्ये पोलीस शिपाई पदाकरिता आवेदन अर्ज सादर केलेला असून सदर अर्ज क्रमांक .................................असा आहे. मी भरती प्रक्रिये संबंधित दिलेल्या जाहिरातीमधील व वेळोवेळी दिलेल्या सर्व सुचना / अटी/ शर्ती स्वत: वाचून त्या अवलोकनात आणून सर्व माहिती स्वत: ज्ञात करुन घेवून विहीत अटी व शर्तीना बांधिल राहून सदर आवेदन अर्ज सादर केलेला आहे.

मी सदर आवेदन अर्जात भरलेली माहिती बरोबर व खरी असून त्यासबंधित विहीत मुदतीतील आवश्यक ती सर्व मुळ कागदपत्रे/प्रमाणपत्रे माझ्याकडे उपलब्ध आहेत. मी त्या मुळ कागदपत्रात/ कागदपत्रातील नमूद माहितीत/मजकुरात स्वत: अगर अन्य कोणाकडूनही मागाहून कोणत्याही प्रकारे आपअधिकाराने बेकायदेशिर फेरबदल केलेला नाही. तसेच पोलीस भरतीत माझी निवड व्हावी याकरिता मी माझ्याविषयीची कोणतीही खोटी माहिती सादर केलेली नाही अथवा दडवून ठेवलेली नाही.

सदर पोलीस शिपाई पदाची भरती प्रक्रिया सुरु असताना किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी मी अर्जात दिलेली माहिती व अर्जासोबत दिलेली कागदपत्रे/प्रमाणपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास, भरती प्रक्रियेत कोणताही गैरप्रकार/गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आल्यास तसेच विहीत अर्हता व निकषांची पुर्तता करीत नसल्याचे निदर्शनास आल्यास कोणत्याही टप्प्यावर मला संपुर्ण भरती प्रक्रियेतून अपात्र करण्यात यावे. अगर नियुक्ती दिलेली असल्यास ती तात्काळ रद्द करण्यात यावी. त्याबाबत माझा कोणताही दावा/तक्रार करण्यास हक्क राहणार नाही तसेच मी पुढील योग्य त्या कायदेशिर कारवाईस पात्र राहीन. म्हणून हमीपत्र लिहून देत आहे.

**ठिकाण** : **उमेदवाराची स्वाक्षरी** ...................

**दिनाक** : / /2023

# पोलीस आयुक्तालय, लोहमार्ग मुंबई

## **पोलीस शिपाई भरती सन 2021**

**- उमेदवाराने मैदानी चाचणी सुरु होण्या अगोदर भरुन द्यावयाचे हमीपत्र - 02**

मी ........................................................................................................ आवेदन अर्ज क्रमांक ..................................चेस्ट क्रमांक ................................. हमीपत्र लिहून देतो/देते की, पोलीस शिपाई पदासाठी घेण्यात येणाऱ्या मैदानी चाचण्यांमध्ये सहभागी होण्याअगोदर आम्हासं चाचण्यांबाबत पुर्ण माहिती देण्यात आलेली आहे. त्यानुसार घेण्यात येणाऱ्या मैदानी चाचण्या मी माझे स्वत:चे जबाबदारीवर करणार आहे. मला हदयविकार,रक्तदाब, मधुमेह किंवा अन्य गंभीर स्वरुपाचा आजार नाही. मैदानी चाचण्या करताना मला कुठल्याही स्वरुपाची इजा झाल्यास किंवा त्यामध्ये माझ्या जिवितास धोका निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी माझी राहील याकरीता मी हमीपत्र लिहून देत आहे.

**ठिकाण** :

**उमेदवाराची स्वाक्षरी** ..................

**दिनाक** : / /2023